# PHOTO


सांस्कृतिक कार्य संचालनालय
काव्य
कार्यशाळा
2019.08.29 12:17




विदर्भ साहित्य संघ
शाखा - लोणार
आपले सहर्ष स्वागत करीत आहे.
भगवान बाबा कला व
वाणिज्य महाविद्यालय
मराठी अभ्यास मंडळ


भगवान बाबा कला व
वाणिज्य महाविद्यालय
वार्षिक स्नेह संमेलन व


लोणार शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित
भगवान बाबा कला व
मराठी अभ्यास




वाणिज्य महाविद्यालय
मराठी अभ्यास मंडळ


मराठी अभ्यास मंडळ


लोणार शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित
भगवान बाबा कला व
वाणिज्य महाविद्यालय


महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
आणि
भगवान बाबा महाविद्यालय, लोणार, जि. बुलढाणा
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री
बाबूजी गदिमा पुलं
महात्रयींची
जन्मशताब्दी
२०१८-२०१९
महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त
लेखन | काव्य |


लोणार शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित
भगवान बाबा कला व
वाणिज्य महाविद्यालय
लोणार, जि. बुलडाणा
मराठी अभ्यास मंडळ
वि. वा. शिरवाडकर यांची जयंती
मराठी भाषा आणि आपण
REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA






सांस्कृतिक कार्य संचालनालय
आणि
2019.08.29 12:37


मराठी अभ्यास मंडळ
2019.10.14 10:26

# News Paper Cutting



## भगवान बाबा महाविद्यालयात मराठी भाषा दिन उत्साहात

लोणार : मार्गदर्शन करताना प्रा.भानुसे व उपस्थित मान्यवर.

दै. सकाळ . 28/02/2018



बुलडाणा. मंगळवार दि.१ मार्च २०१६

## सजग पालक होण्यासाठी पाल्याच्या भावना समजून घ्या - नरेंद्र लांजेवार

तालुका प्रतिनिधी/२९ फेब्रुवारी

लोणार : विदर्भ साहित्य संघ, तेजस्विनी सखी मंच व भगवान बाबा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन शब्द आई - बाबासाठी या कार्यक्रमाचे आयोजन मराठी राजभाषा दिवसाचे औचित्य साधून कै.संतोष नागरे यांच्या द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रा.संतोष नागरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी आज पालकातील व पाल्यातील संवाद कमी होत चालला आहे. आपण आपल्या मुलांच्या कुवतीनुसार त्याच्यावर अपेक्षा लादल्या पाहिजे. पालकाने मुलावर विश्वास दाखवून त्याच्या मनाचा विचार केला पाहिजे. कार्यक्रमाचे उद्घाटक ज.ह.खरात यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले की,' आजच्या पिढीला अशा कार्यक्रमाची नितांत गरज आहे. कारण आजची पिढी आपल्या माता पिताबद्दल बेजबाबदार झाली आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब क्षीरे अध्यक्ष सिद्धेश्वर शिक्षण मंडळ उद्घाटक, ज.ह.खरात, पाचपावलिकर अतिथी प्राचार्य एस.जी.बडे, शिक्षण सभापती शेख समद शेख अहमद, प्रा.एस.एम.मापारी, केंद्रप्रमुख पि.एम.मापारी, सौ.उषाताई फड सचिव महिला मंडळ लोणार, तेजस्वीनी सखी मंच अध्यक्षा सौ.मिना सोसे हे होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.विठ्ठल भानुसे, प्रास्तविक प्रा.गजानन खरात, आभार प्रदर्शन सौ.मीना सोसे यांनी केले.यावेळी सौ.मिना सोसे यांनी आजच्या पालकावर आधारित कविता सादर केली.

मार्गदर्शन करतांना नरेंद्र लांजेवार व उपस्थित इतर मान्यवर

त्या बोगस फेरफार व बनावट अकृषक आदेश प्रकरणी



## मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

लोणार : येथील भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी 'मला कविता भेटली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.जी. बडे होते. तसेच प्रमुख उपस्थिती डॉ. भानुसे, डॉ. गीते, डॉ. सुनील पवार व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



## मराठी वाङ्:मय उद्घाटन सोहळ्यात कवितांची मैफील

मेहकर, ता. ७ : कविता ही फुलपाखरासारखी सुकुमार आणि सुंदर असते. तिला कडव्याच्या सुंदर पाकळ्या असतात. या पाकळ्यातून कवितेच्या आशयाचा गंध दरवळत असतो. कविता ही फुलपाखरासारखी असते पण, फुलापेक्षा श्रेष्ठ असते. फुल ही सन्मानियांच्या गळ्यात असतील तर कविता ही सर्वांच्या ओठावर असल्याचे प्रतिपादन मेहकर येथील कवी डॉ. सुनील पवार यांनी केले.

भगवानबाबा कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी वाङ्:मय मंडळाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी मला कविता भेटली या कार्यक्रमात डॉ. पवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. जी. बडे होते तर प्रमुख उपस्थितीत डॉ. भानुसे, डॉ. गीते तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमात त्यांनी बेटी बचाव, शेतकरी, आई, प्रेम अशा अनेक विषयावर अनोख्या कविताचा सादर केल्यात. सामाजिक विषमतेवर प्रहार करताना त्यांनी कविता सादर केली. दुःखाचे स्फोटक रसायन म्हणजे कविता होय. अस्सल काव्यनिर्मिती होण्यासाठी हृदयाची घुसळण झाली पाहिजेत कारण घुसळण झाल्याशिवाय ताकातून लोणी, ओढातून गाणी आणि डोळ्यातून पाणी येत नाही. माझी कविता विकास मार्गावर पाऊल टाकत असताना तिला इतरांच्या कवितेने आकर्षित केले. कवितेने माणूस वेडा होतो परंतु, कवितेने मला शहाणे केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गीते यांनी तर सूत्रसंचालन वारे यांनी केले.

सकाळ

# भगवानबाबा महाविद्यालयात वाङ्:मय मंडळ स्थापन

## मान्यवरांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; मराठी साहित्यावरही टाकला प्रकाश

**लोणार, ता. ११ :** भगवान बाबा कला, वाणिज्य महाविद्यालयात नुकताच मराठी वाङ्:मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून ज्येष्ठ कवी तथा चित्रकार श्रीधर अंभोरे तर अध्यक्षाचे कवी व साहित्यकार डॉ. विशाल इंगोले हे होते.

महाविद्यालयातील तरुणांना साहित्याची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्या अभिव्यक्तीला हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून दरवर्षी वाङ्:मय मंडळाची स्थापना करण्यात येते. चित्रकार श्रीधर अंभोरे यांना पद्मश्री दया पवार पुरस्कार २०१३, पद्मश्री विखे पाटील पुरस्कार २०१३ यांसह विविध पुरस्कार, आजपर्यंत ३०० नामांकीत लेखकाच्या पुस्तकाला मुख्यपृष्ठ तसेच विजय तेंडुलकर यांनी



लोणार : वाङ्:मय मंडळाची स्थापना प्रसंगी उपस्थित मान्यवर.

घेतलेली मुखालत, युवकभारती या १२ वी च्या वर्गात संकिर्णमध्ये प्रकाशित झालेली आहेत. महाविद्यलयातील तरुणांना साहित्याची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्या अभिव्यक्तीला हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून दरवर्षी वाङ्:मय मंडळाची स्थापना करण्यात येते. कार्यक्रमाच्या सुरवातीला उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनाने स्वागत करण्यात आले. त्यावेळी प्रास्ताविक करताना प्रा. विठ्ठल भानुसे यांनी मराठी वाङ्:मय मंडळाची उदिष्ट व उपाययोजना सांगितली. यावेळी श्रीधर अंभोरे यांनी साहित्याचे आजच्या पिढीला वाचवू शकते. कारण, अत्याधुनिक प्रसार साधनामुळे आजच्या तरुणांत नैराश्य निर्माण केले आहे. यातून त्याला साहित्य बाहेर काढू शकते आणि विद्यार्थ्यांनी विविध कला जोपासत सुद्धा कसे करिअर घडवू शकते यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विशाल इंगोले यांनीही मनोगत व्यक्त करत साहित्य त्यांची व्याप्ती आणि आजमितीला देशासमोर असलेली आवाहन व समस्या शासन दरबारी नेण्याचे काम करणे हेच खरे साहित्याचे वैशिष्ट आहे तसेच, माणसाला माणूस म्हणून जगविणे हे सुद्धा साहित्यच करू शकते व आपल्या विविध कवितेचे सारांश घेत महाविद्यालयातील युवक- युवतींना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सूर्यकांत गीते आणि आभार प्रदर्शन महादेव सांगळे यांनी केले.

Akola, Buldhana-Today
13/09/2018 Page No. 3

---

आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

तपासणी अभियान राबविण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

# भगवानबाबा महाविद्यालयात मराठी दिन साजरा




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. गजानन वाघ. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

◆ **लोणार, ४ मार्च**

येथील भगवानबाबा महाविद्यालय व विदर्भ साहित्य संघ शाखा लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने वि. वा. शिरवाडकर यांची जयंती मराठीदिन म्हणून साजरी करण्यात आली.

यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ज. ह. खरात पाचपावलीकर होते. तर, व्यासपीठावर मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना ज. ह. खरात म्हणाले की, शरीर सौष्ठवासाठी व्यायाम आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भाषा सौष्ठव चांगले राहण्यासाठी भाषिक कौशल्ये विकसित होणे गरजेचे आहे, असे सांगितले. भाषा अभिवृद्धीसाठी विदर्भ साहित्य संघ राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. तसेच, मराठी भाषेचे सांस्कृतिक महत्त्व त्यांनी पटवून दिले. यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील साहित्याच्या इतिहासाचा धांडोळा त्यांनी घेतला.

प्रमुख वक्ते प्रा. गजानन वाघ यांनी विनोदी शैलीतून विद्यार्थ्यांना भाषा अभिवृद्धीसाठी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक प्रा. सूर्यकांत गिते यांनी केले. संचालन शीतल मुंडे यांनी तर, आभार प्रदर्शन प्रा. विठ्ठल भानुसे यांनी केले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. शाम बढे, विदर्भ साहित्य संघाचे सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# मातृभाषेचा प्रत्येकाने अभिमान बाळगावा

## प्रा. गजानन वाघ : भगवान बाबा महाविद्यालयात मराठी भाषा दिन



लोणार : कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. गजानन वाघ.

**लोणार, ता. २८ :** कुठल्याही भाषेचा द्वेष मनात असू नये. मराठी आपली मातृभाषा असली तरी इतर भाषांचाही आपल्या मनात आदरच हवा. मातृभाषेचा तर मनात नुसता आदर नको, तिचा तर आपण अभिमान बाळगायला हवा, असे प्रतिपादन वाशीम येथील पत्रकार तथा भाषा अभ्यासक प्रा. गजानन वाघ यांनी केले.

येथील भगवानबाबा महाविद्यालयात आयोजित मराठी दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ कवी, लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ज. ह. खरात अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. श्यामराव बडे, मराठी विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल भानुसे यांची प्रमुख उपस्थिती होती. भगवानबाबा महाविद्यालय आणि विदर्भ साहित्य संघाच्या लोणार शाखेच्या संयुक्त वतीने हा कार्यक्रम झाला. पुढे बोलताना प्रा. वाघ म्हणाले, भाषा हा मानवी जीवनाचा प्राणवायू आहे. मानवाला मिळालेली ती अमूल्य देणगी आहे. भाषा कमावता आली पाहिजे, असे सांगून मराठी भाषेची कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणातून ज. ह. खरात यांनी मराठी साहित्यात बुलडाणा जिल्ह्याचे योगदान विशद करतानाच, आपल्या काही कवितांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. कु. शीतल मुंडे हिने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. सूर्यकांत गीते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विठ्ठल भानुसे यांनी आभार मानले.

# मराठी भाषा दिन साजरा

**लोणार(वि.प्र.) :** कुठल्याही भाषेचा द्वेष मनात असू नये. मराठी आपली मातृभाषा असली तरी इतर भाषांचाही आपल्या मनात आदरच हवा, असे प्रतिपादन वाशीम येथील भाषा अभ्यासक प्रा. गजानन वाघ यांनी २७ फेब्रुवारी रोजी केले.

येथील भगवानबाबा महाविद्यालयात आयोजित मराठी दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी, लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ज.ह.खरात अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. श्यामराव बडे, मराठी विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल भानुसे यांची प्रमुख उपस्थिती होती. भगवानबाबा महाविद्यालय आणि विदर्भ साहित्य संघाच्या लोणार शाखेच्या संयुक्त वतीने हा कार्यक्रम झाला. अध्यक्षीय भाषणातून ज. ह. खरात यांनी मनोगत व्यक्त केले. कु. शीतल मुंडे हिने सूत्रसंचलन केले. प्रा. डॉ. सूर्यकांत गीते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विठ्ठल भानुसे यांनी आभार मानले.

ePaper देशोन्नती Tue, 05 March 2
https://deshonn

# लोणार येथे श्रावणमासी कविसंमेलन



उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मान्यवर

*तालुका प्रतिनिधी / १९ ऑगस्ट*

**लोणार :** भगवान बाबा महाविद्यालय लोणार येथे १८ ऑगस्ट रोजी विदर्भ साहित्य संघ शाखा लोणारच्या वतीने श्रावणमासी कविसंमेलन उत्साहात पार पडले .

कविसंमेलनाचे अध्यक्ष पा.मा. गायकवाड सर मेहकर हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून नारायण पाटील सुलतानपूर ,सा. ना. इंगळे सर व ॲड. विजयकुमार कस्तुरे व लोणार येथील लेखिका डॉ. मीना सोसे मॅडम ह्या होत्या. या कवीसमेलनात विद्या सरपाते, राजेश्वर चव्हाण, फेरोज सर, प्रदीप इक्कर , अशोक भालेराव जगदीश नरवाडे , रतन डोंगरे , विजय दळवी, रमेश थोरात सर , दत्ता पवार, विनोद हिवाळे , विद्याधर चीपडे , प्रा. आश्रुबा सोडनर, विलायत कातीब सर प्रा. पुरुषोत्तम चव्हाण , नसीम सर , डॉ. मीना सोसे मॅडम, डॉ ?. विशाल इंगोले , सुनील घोडके , कुसुंबे सर , साबळे सर , शिवणकर सर, कथाकार बबन महामुने , प्रा. अशोक सारडा , मनोहर पवार , निवृत्ती जाधव , सोभागे सर, सा. ना. इंगळे सर आदिकवींनी यामध्ये सहभाग घेतला होता . या कार्यक्रमाचे संचालन प्रा. पुरुषोत्तम चव्हाण यांनी केले होते. तर प्रास्ताविक प्रा. आश्रूबा सोडनर यांनी केले . या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्याधर चिपडे , विजयकुमार दळवी , प्रा. आश्विन राठोड , दत्ता पवार , रतन डोंगरे , प्रा. भानुसे यांच्यासह भगवानबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य , व सर्वच प्राध्यापक व कर्मचारी तथा साहित्य क्षेत्रातील सर्वच सहकारी व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे आभार प्रा. भाणुसे सर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता ही राष्ट्रगीताने करण्यात आली.

लोकमत

# संगीत, काव्य, साहित्यावर कार्यशाळा

**लोणार:** सुधीर फडके, ग. दी. माडगुळकर आणि पू. ल. देशपांडे यांचे विचार, साहित्य जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहचवण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचनालय महाराष्ट्र शासन व भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालय लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत, काव्य व साहित्य या तीन विषयावर २९ ऑगस्ट रोजी कार्यशाळा घेण्यात आली.

उद्धघाटन सोहळ्याचे अध्यक्ष लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शंकरराव वाघ हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ज. ह. खरात, उपाध्यक्ष शांतिलाल गुगलिया व सहसचिव माधवराव सांगळे हे होते. तर मार्गदर्शक म्हणून मोहन सिरसाट, रश्मी कारखानीस, मकरंद जोशी, वसंतराव गणोरकर, अनिरुध कुलकर्णी, रेणुकादास देशपांडे हे होते. स्वागत गीत व पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्तविक प्राचार्य डॉ. एस. जी. बडे यांनी केले. त्यानंतर संगीत, काव्य व साहित्य या तीन विषययांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी काव्य कार्यशाळे कवितेचे विविध रचनाबंध, कविते प्रकार, तर लेखन कार्यशाळेत लेख करण्यासाठी पाहिजे असलेले विवि गुण व लेखन क्षेत्रात असलेल विविध संधी तर संगीत कार्यशाळे स्वराचे मार्गदर्शन केले. यावेळी संगि कार्यशाळेसाठी प्रा. नालिंदे, का कार्यशाळेसाठी प्रा. डॉ. बोरसे लेखन कार्यशाळेसाठी प्रा. खरात यां परिश्रम घेतले. संचालन प्रा. ड सूर्यकांत गिते तर आभार समन्वय प्रा. विठ्ठल भानुसे यांनी मानले.

Hello Buldhana
Page No. 4 Aug 31, 2019
Powered by: erelego.com